# छत्रपती शिवाजी महाराज यांचे जीवन व राजनीति

**प्रा. निशांत राजेंद्रकुमार गोंधळी.** सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग, स. ब. खाडे महाविद्यालय, कोपार्डे

---

छत्रपती शिवाजी महाराजांचे चरित्र म्हणजे मराठी माणसाचे महाकाव्य आहे. महाराष्ट्रात 'रामायण' आणि 'महाभारत' या महाकाव्यांबरोबर किंबहुना त्यापेक्षाही अधिक मानाचे स्थान शिवचरित्राला दिले जाते. महाराष्ट्राच्या भूमीमध्ये घडलेला एक जिवंत आणि तेजस्वी इतिहास म्हणजे शिवचरित्र. ज्या गडावर शिवाजी महाराजांचा जन्म झाला तो शिवनेरी, जिथे राज्याभिषेक झाला तो रायगड आजही शिवाजी महाराजांच्या इतिहासाची साक्ष देतो. जावळीचे खोरे आणि अफजलखानाची कबर आजही खानाच्या वधाचे चित्र आपल्या डोळ्यासमोर उभे करते. स्वराज्य स्थापनेच्या कार्यात आत्मबलिदान करणारे अत्रे, हनुमंते, प्रभू, मालुसरे, पालकर, मोहिते गुजर, घोरपडे, जाधव, काकडे यांचे वंशज आजही शिवकालीन पूर्वजांचा अभिमान बाळगत आहेत. इस्लामी सुलतानांचे धर्मावर, संस्कृतीवर, मराठी अस्मितेवर आक्रमण होत असताना मराठ्यांनी हिंदू धर्म, संस्कृती, अस्मिता यांचे रक्षण महाराष्ट्रात केले. १७ व्या शतकात छत्रपती शिवाजी महाराजांनी मराठमोळ्या माणसांचे संघटन करून त्यांना स्वातंत्र्याच्या कार्याने, विचाराने भारून टाकले आणि स्वराज्य निर्मिती केली. म्हणूनच मराठी माणसांच्या दृष्टीने शिवचरित्राचे स्थान अढळ आहे. सुमारे ३०० वर्षे महाराष्ट्रात सामाजिक चळवळ सुरू झाली होती. या चळवळीचे नेतृत्व ज्ञानदेवांपासून तुकारामांपर्यंत अनेक संतांनी केले. पुढे शिवाजी महाराजांनी राजकीय चळवळ सुरू केली आणि पूर्वीच सुरू झालेल्या सामाजिक चळवळीशी संगम होऊन स्वराज्याची स्थापना झाली. हे स्वराज्य म्हणजे दक्षिणेमधील क्रांती होती. ही क्रांती आदिलशहा, मुघल सत्ता आणि आलमगीर औरंगजेब बादशहालाही नष्ट करता आली नाही. ही महान क्रांती ज्या महाराष्ट्रात घडली आणि ज्यांनी घडवली असे छत्रपती शिवाजी महाराज स्वराज्य स्थापनेचे कर्ते आणि द्रष्टे राजे होत.[१]

**जीवन**

महाराष्ट्राची भूमी म्हणून आज ओळखला जाणारा प्रांत १७ व्या शतकात विविध सत्तांनी वेढलेला होता. त्यावर अहमदनगरचा निजामशहा, विजापूरचा आदिलशहा, मुघल, सिद्धी, पोर्तुगीज, डच, फ्रेंच, इंग्रज या सत्तांचे वर्चस्व होते. सततच्या संघर्षामुळे महाराष्ट्रात अस्थिरता आणि असुरक्षितता निर्माण झाली होती. प्रांतांमध्ये जातीय विषमता मोठ्या प्रमाणावर होती. सत्तेवर कोणीही असले तरी रयतेला काहीही फरक पडत नव्हता. याचे कारण म्हणजे राज्य कोणाचेही बदलले तरी पाटील, कुलकर्णी, वतनदार, देशमुख, जहागीरदार तेच असायचे. हा वर्ग मोठ्या स्वरूपात रयतेकडून दामदुपटीने कर वसूल करत होता. म्हणजेच रयतेची लूट दुहेरी स्वरूपात होत होती. शिवाय सैन्याच्या बळावर आपल्याच प्रजेतील स्त्रियांचे शोषण सुद्धा ते करीत होते. सोळाव्या स्थळाच्या उत्तरार्धात व सतराव्या शतकाच्या पूर्वार्धात भोसले घराण्याचा उदय झाला. त्यांचे मूळ वंशज केव्हा, कुठून, कसे आले याविषयी ठोस माहिती उपलब्ध नसली तरी १६७४ मध्ये शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकास ते क्षत्रिय नसल्याच्या कारणांवरून त्यांचे 'राजपद' नाकारत महाराष्ट्रातील 'ब्रह्मवृंदानी' मोठ्या स्वरूपाचा विरोध केला. एवढेच नव्हे, तर छ. शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकावर ब्राह्मण समाज बहिष्कार घालत आहे, असे जाहीरही केले.[२] त्यावेळी छ. शिवाजी महाराजांचे क्षत्रियत्व सिद्ध करण्यासाठी त्यांची वंशावळ तयार करून त्यांचा वंश सिसोदिया (राजपूत) वंशाशी जोडण्यात आला आणि पुढे मराठी बखरींनीही तोच क्रम चालू ठेवला.[३] छत्रपती शिवाजी महाराजांचा उदय ही महाराष्ट्रातील एक अभूतपूर्व घटना होय. त्यामुळे एका नवीन युगाचा प्रारंभ झाला.[४] छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्म शके १५५१, फाल्गुन वद्य तृतीयेस म्हणजेच १९ फेब्रुवारी १६३० मध्ये पुणे जिल्ह्यातील जुन्नरजवळील शिवनेरी किल्ल्यावर झाला. शिवाजी महाराजांच्या आई जिजाबाई या सिंदखेडचे राजे लखुजी जाधव व म्हाळसाबाई यांच्या कन्या होत. त्या मुळातच हुशार आणि शूर होत्या. त्यांच्यावर बालपणातच उत्तम संस्कार झालेले होते. त्यांना लहानपणीच विविध विद्यांबरोबर लष्करी शिक्षणही मिळाले होते. त्या कर्तबगार व द्रष्ट्या राजनीतीज्ञ होत्या. छत्रपती शिवाजी महाराजांचे वडील शहाजीराजे हे दक्षिणेतील मातब्बर सरदार तथा फर्जंद होते. त्यांनी निजामशाही व आदिलशाहीमध्ये अनेक पराक्रम गाजवले होते. त्यांच्याकडे भीमा व नीरा या नद्यांमधील पुणे, सुपे, इंदापूर, चाकण व कर्नाटकात बंगळूर व आसपासचा प्रदेश जहागीर म्हणून होता. ते स्वतः संस्कृतचे गाढे विद्वान होते. शहाजीराजे पराक्रमी, धैर्यशील, बुद्धिमान आणि श्रेष्ठ राजनीतिज्ञ होते. ते उत्तम धनुर्धर तसेच तलवार, पट्टा व भाला चालवण्यात पटाईत होते. शिवराय व जिजाऊ बंगळूरमध्ये असताना त्यांनी शिवरायांना राजा बनण्यासाठी योग्य असे उत्तम शिक्षण देण्याची व्यवस्था केली होती. परकीय लोकांच्या सत्ता उलथवून स्वराज्य स्थापन करावे ही त्यांची स्वतःची तीव्र आकांक्षा होती. म्हणूनच त्यांना 'स्वराज्य संकल्पक' म्हटले जाते. त्यांनी शिवराय व जिजाऊ यांना विश्वासू व कर्तबगार सहकाऱ्यांनिशी बंगळूरहून पुण्याला पाठविले.[५] शिवाजी महाराजांचे बालपण मोठ्या धामधुमीत गेले. शिवजन्माच्या वेळी खुद्द शहाजी राजे आदिलशाहीला

कंटाळून पुन्हा निजामशाहीच्या दरबारी आले होते. या संघर्षाच्या काळात एकसारख्या धावपळीच्या लढाया त्यांना कराव्या लागत होत्या. त्यामुळे जिजाबाई व बाल शिवाजी यांनाही शत्रूंना चुकवण्यासाठी व रक्षण करण्यासाठी धावपळ करावी लागली.

छत्रपती शिवाजी महाराज हे दादोजी कोंडदेव व मातोश्री जिजाबाई या दोघांच्याच मार्गदर्शनाखाली व देखरेखीखाली वाढले व पहिले संस्कार या दोघांचेच त्यांच्यावर झाले. जिजाबाई आणि शिवाजी महाराज यांच्या निवासासाठी दादोजींनी लाल महाल हा वाडा नव्याने बांधला. "जवळच हत्ती, घोडे वगैरेंची पागा तयार केली. शिवाजी तेथे येऊन राहू लागला. तेव्हा त्याजकरिता उंची कपडे, जवाहीर वगैरे सिद्ध करून लोकांनी त्यास आपला स्वामी व पालनकर्ता समजावे अशा प्रकारची सिद्धता केली; जणू काय त्यास शिवाजीच्या भावी उदयाचे स्वप्नच पडले होते" (सरदेसाई) [६] १६३५-३६ च्या दरम्यान पुणे येथील जहागिरीवर जिजाऊ आणि छत्रपती शिवाजी महाराजांनी लाल महाल बांधून आपला राज्यकारभार सुरू केला. बाजी पासलकरांकडून घोडेस्वारी, सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यात शस्त्रविद्या, वेगाने गड चढणे-उतरणे, ढाल, तलवार, भाला, दांडपट्टा इत्यादी लष्करी शिक्षण त्यांनी घेतले. तसेच जिजाऊंनी त्यांच्या शिक्षणाकडे जातीने लक्ष दिले. जिजाऊ चालवत असलेला कारभार अगदी लहान वयापासून ते पाहत आले होते. नंतरच्या काळात छत्रपती शिवाजी महाराज स्वतः पत्रव्यवहार करीत असलेले आपल्याला दिसून येतात. त्याची बीजे आपल्याला इथेच दिसून येतात. आजही ती पत्रे अभ्यासकांसाठी उपलब्ध आहेत.[७] दादोजी कोंडदेव यांनी गुरु म्हणून अनेक शास्त्रे, विद्या व भाषा तसेच राज्यकारभार कसा करावा, किल्ले कसे बांधावेत इत्यादी विद्या शिवाजी महाराजांना शिकवल्या. तत्कालीन धावपळीच्या काळातही जिजाबाईंनी शिवरायांच्या मनात कर्तृत्वाची ठिणगी टाकताना राजनीती, समान न्याय देण्याची वृत्ती आणि अन्याय करणाऱ्यास कठोरात कठोर शिक्षा देण्याचे धाडस दिले. शस्त्रास्त्रांच्या प्रशिक्षणावर बारकाईने लक्ष दिले. तत्कालीन काळात चालत असलेली सरंजामशाही, मनमानी कारभार, शेतकऱ्यांचे हाल-अपेष्टा, अन्याय व बळजबरीने शेतसरा वसुली इत्यादी गोष्टींची जाणीव करून दिली. हे सर्व संस्कार एक पराक्रमी, शूर राजा होण्यास भविष्यात कारणीभूत ठरले. शिवाजी महाराजांचा फलटणच्या सईबाई निंबाळकर यांच्याशी १६ मे १६४० रोजी पहिला विवाह झाला. त्यानंतर कऱ्हाड प्रांतातील सोयराबाई मोहिते, रत्नागिरी प्रांतातील सगुणाबाई शिर्के, पैठण प्रांतातील पुतळाबाई, रायगड प्रांतातील लक्ष्मीबाई विचारे, पुणे प्रांतातील सकवारबाई गायकवाड, जालना प्रांतातील काशीबाई जाधव आणि कोल्हापूर प्रांतातील गुणवंताबाई इंगळे यांच्याशी असे एकूण आठ विवाह झाले.[८] छत्रपती शिवाजी महाराजांना अक्षरज्ञान चांगले होते, याविषयी खात्री देणारे पुरावे फॅक्टरी रेकॉर्डमध्ये सापडतात. त्याचबरोबर शिवाजी महाराजांचे वडील शहाजीराजे आणि पुत्र संभाजी हे दोघेही संस्कृत भाषेचे जाणकार होते. स्वतः शिवाजी महाराजांनी 'राज्यव्यवहार कोश', 'करण कौस्तुभ' यासारखे संस्कृत ग्रंथ विद्वानांकडून लिहून घेतले. शिवभारतकार परमानंद हा तर प्रत्यक्ष शिवाजी महाराजांच्या दरबारात होता. तसेच 'शिवभारत'मध्ये शिवाजी महाराज लिपीग्रहण योग्य वयाचे झाल्यावर शहाजीराजेंनी त्यांना गुरूंच्या स्वाधीन केले असा उल्लेख आलेला आहे. शिवभारतातील नवव्या अध्यायातील उल्लेखावरून शिवाजी महाराज साक्षर होते हे स्पष्ट होते.[९] ९१ कलमी बखरीमध्ये शहाजीराजेंच्या आज्ञेप्रमाणे दादोजी कोंडदेव यांनी चिरंजीवास म्हणजेच छत्रपती शिवाजी महाराजांना शहाणे केले असा उल्लेख आहे. हा एकच पुरावा शिवाजी महाराजांच्या साक्षरतेची खात्री पटवण्यास पुरेसा आहे. इ. स. १६४०-४१ मध्ये शिवाजी महाराज आणि जिजाबाई शहाजीराजांच्या बोलावण्यावरून बंगलोरला गेले होते. इ. स. १६४२ मध्ये जिजाबाई आणि छत्रपती शिवाजी महाराज पुण्यास परतले. पुण्यात आल्यानंतर शिवाजी महाराजांच्या कर्तृत्वाला प्रारंभ झाला. त्यावेळी त्यांचे वय केवळ बारा वर्षांचे होते. बारा वर्षांच्या छत्रपती शिवाजी महाराजांनी दादोजी कोंडदेव यांच्या अनुभवाचा फायदा घेत पुण्याच्या परिसरातील अंदर मावळ, नाणे मावळ, पवन मावळ, कोरबारसे मावळ, पौड खोरे, मुठे खोरे, मुसे खोरे, गुंजन मावळे, कानद खोरे, वेळवंड खोरे, हिरडस मावळ, रोहिड खोरे हे बारा मावळे आपल्या वर्चस्वाखाली आणले. दादोजी कोंडदेव यांच्यासोबत मावळच्या दुर्गम भागात प्रवास करत या भागाची अचूक माहिती शिवाजी महाराजांना याच काळात झाली. [१०]

**स्वराज्य कार्यास सुरुवात**

१७ एप्रिल १६४५ रोजी शिवाजी महाराजांनी दादोजी नरसप्रभू देशपांडे यांना लिहिलेले एक पत्र उपलब्ध आहे. या पत्रात "हे राज्य व्हावे हे श्रींचे मनात फार आहे", असा स्पष्ट उल्लेख असून या पत्रातच हिंदवी स्वराज्य हा ही शब्द आलेला आहे. १६४५ पासून शिवाजी महाराजांच्या मनात स्वतंत्र राज्याची कल्पना आकार घेऊ लागली होती. २८ जानेवारी १६४६ या तारखेचे शिवाजी महाराजांचे न्यायनिवाडाविषयक एक पत्र उपलब्ध असून या पत्राच्या शिरोभागी शिवाजी महाराजांची मुद्रा आढळते.

प्रतिपच्चंद्र लेखेव वर्धिष्णुर्विश्ववंदिता ||
शाहसूनो: शिवस्यैषा मुद्रा भद्राय राजते ||

पत्राच्या अखेरीस 'मर्यादेयं विराजते' ही दुसरी मुद्रा दिसून येते. शिवाजी महाराजांची उपरोक्त मुद्रा म्हणजे त्यांच्या स्वराज्य कार्याचा प्रारंभ झाल्याची साक्ष आहे. १६४७ पासून स्वराज्यकार्य शिवाजी महाराजांनी द्रुत गतीने सुरू केलेले आढळते. ७ मार्च १६४७ रोजी दादोजी कोंडदेव यांचा मृत्यू झाला आणि शहाजीराजांच्या जहागिरीची संपूर्ण जबाबदारी शिवाजी महाराजांवर आली. स्वतंत्र वृत्तीच्या शिवाजी महाराजांनी स्वराज्य स्थापनेचा धाडसी उद्योग हाती घेतला. १६४७ मध्ये तोरणा आणि राजगड हे घेतलेले दोन किल्ले म्हणजे स्वराज्य स्थापनेच्या कार्याला झालेली सुरुवात म्हणावी लागेल.[११] महाराजांच्या मुद्रेबद्दल व त्यांच्या लोककल्याणकारी कारभाराबद्दल रियासतकार सरदेसाई म्हणतात, "ही मुद्रा अत्यंत सार्थ असून ती मराठी राज्याची गुरुकिल्लीच म्हणता येईल. ही सुंदर मुद्रा म्हणजे मराठ्यांचा सारभूत इतिहास व शिवचरित्राचे मुख्य रहस्य दाखविते. या मुद्रेचा काल हाच शिवाजीच्या उद्योगाचा आरंभ असे नि:संदिग्ध म्हणता येते. सारांश, स.१६४७ पासून शिवाजीचा हा उद्योग लोकांचे मनात चांगला भरून त्याच्या कर्तृत्वाविषयी आदरभाव उत्पन्न झाला. इतका की आदिलशाही मुलखाच्या मानाने मावळातील लोकांस वित्त-जीविताची जास्त शाश्वती वाटू लागली."[१२] जिजाबाईंचे माहेर देवगिरीच्या यादवांचा वारसा सांगणारे, तर उदयपूरच्या राजघराण्याचा वारसा सांगणारे होते. या दोन्ही थोर घराण्यांचा राजकीय आणि सांस्कृतिक वारसा शिवाजी महाराजांना प्राप्त झाला होता. तसेच यवनांबद्दलचा तिरस्कार निर्माण करत त्यांना प्रतिकार करून स्वराज्य स्थापण्याचे कार्य आपल्या पुत्राकडून व्हावे, अशी परिस्थिती जिजाऊंनी निर्माण केली. दृढ धर्मनिष्ठा, दैवी गूढता, संत महंतांबद्दलची असीम श्रद्धा, सीमातीत साधेपणा, विशुद्ध शीलचारित्र्य, राज्यकारभाराचे व राजनीतीचे धडे या देणग्या महाराजांना मातोश्रींकडून मिळाल्या. तर राज्यकारभार कौशल्याची तत्त्वे, कठोर शिस्तीचे धडे, नैतिक अधिष्ठानाची शिकवण, शेती सुधारणेसाठी करावयाचे प्रयत्न, न्यायदानाचे प्रशिक्षण, लष्कर उभारणीसाठीचे प्रयत्न या देणग्या दादोजी कोंडदेवांकडून महाराजांना मिळाल्या. असे राज्यकर्त्यास आवश्यक असणारे गुण महाराजांच्या ठिकाणी निर्माण झाले व त्यांची पुढे वाढ होऊन महाराष्ट्राला हा थोर राजा लाभला.[१३]

**राजनीती**

लहान वयातच शिवाजी महाराजांवर उत्तम संस्कार झाल्यामुळे त्यांना माणसांची पारख करता यायची. बाजी पासलकर यांच्या मदतीने शिवाजीराजे मावळ्यांमध्ये फिरून सैन्य गोळा करीत. सैन्यात भरती करण्यासाठी तरुणांना प्रोत्साहन देत, त्यांना विश्वासात घेत. तसेच गरीब शेतकऱ्यांची मुले असल्याने महाराज त्यांना धान्य दुधदुभत्यासाठी जनावरे व नगदी पगार देत. त्यामुळे भेदभाव विसरून सर्व जाती धर्मातील हजारो तरुण सैन्यात भरतीसाठी तयार झाले. या सर्वांना महाराज आणि बाजी पासलकर विविध प्रकारचे प्रशिक्षण देत असत. त्यामध्ये दांडपट्टा, मल्लखांब, धावणे, झाडे चढणे, मल्लयुद्ध, मुष्टीयुद्ध, गोफणीचा मारा, धनुष्यबाण, भालाफेक, ढाल-तलवार, बंदूक, गडकोट किल्ल्यावर चढणे, हल्ला करणे, अंधारात फिरणे, उपाशी राहणे, हेरगिरी करणे, देहबोलीसह गुप्त भाषांचा वापर करणे अशा अनेक प्रकारे तरुणांना तयार केले. हेरगिरीसाठी रामोशी, भिल्ल या जमातींचा उपयोग केला.[१४] शिवाजी महाराजांचे हेर म्हणजे बहिर्जी, हैबती व विश्वासराव. अठरापगड जातीच्या माणसांमध्ये मन्नेवार, भिल्ल, गोंड, कोळी, महार, मांग, मेहतर, रामोशी, मुसलमान, पठाण, न्हावी, ब्राह्मण, मराठा, अशी शेतीत राबणारी विविध जातीची माणसे होती. ज्यात बाजी पासलकर, येसाजी कंक, संभाजी कावजी, तानाजी मालुसरे, बाजीप्रभू देशपांडे, विसाजी मुश्बन्कर, सुराजी काटके, कृष्णाजी गायकवाड, गोपीनाथ पंत बोकील, कान्होजी आंग्रे, मोरोपंत, निळोपंत, प्रल्हाद निराजी, बाळाजी आवजी, बाजी सर्जेराव जेधे, तानाजी मालुसरे, नेताजी पालकर (प्रतिशिवाजी), निरो रावजी, मुरारबाजी, हिरोजी फर्जंद, शिवा न्हावी, महाराजांचा आरमार प्रमुख दौलतखान दर्यासारंग मुसलमान, आरमार सरदार मायनाक भंडारी महार, तोफखाना प्रमुख इब्राहिमखान मुसलमान, शिवाजी महाराजांचा वकील काझी हैदर मुसलमान, शिवाजी महाराजांचे अंगरक्षक मदारी मेहतर, जिवाजी महाला, हेर प्रमुख बहिर्जी नाईक रामोशी जातीचा, रायगडावर चढून जाणारा डोंबारी अस्पृश्य जातीचा, याच रांगड्या गड्यांच्या भरवशावर शिवाजी महाराज स्वराज्य उभे करण्याचा प्रयत्न करीत होते.

शिवाजी महाराजांनी सैन्याची उभारणी केली. शिवाजी महाराज ज्या जहागिरीत राहत होते तेथील किल्ले आदिलशहाच्या ताब्यात होते. त्या काळात किल्ल्यांचे विशेष महत्त्व होते. किल्ला ताब्यात असला म्हणजे आजूबाजूच्या प्रदेशांवर नियंत्रण ठेवता येत असे. 'ज्याचे किल्ले त्यांचे राज्य' अशी तत्कालीन परिस्थिती होती. आपल्या जहागिरीतील किल्ले आपल्या ताब्यात घ्यायचे महाराजांनी ठरवले, तेव्हा शिवाजी महाराजांचे वय अवघे सोळा वर्षांचे होते. तरीही न डगमगता १६४६ मध्ये राजांनी प्रचंडगडावर आक्रमण करून किल्ला जिंकला. स्वराज्यात आलेला हा पहिलाच किल्ला होता. या किल्ल्यामुळे स्वराज्याचे तोरण बांधले गेले. त्याचे नामकरण पुढे 'तोरणा किल्ला' असे करण्यात आले. त्यानंतर मुरुंबदेव, कोंढाणा, पुरंदर यासारखे अनेक किल्ले जिंकले. मुरुंबदेव किल्ल्याचा जीर्णोद्धार करून त्याची पुनर्बांधणी करून त्याचे नाव 'राजगड' ठेवले. राजगड ही स्वराज्याची राजधानी केली. या साऱ्यामुळेच लोकांमध्ये 'हे राज्य रयतेचे आहे' हा विश्वास निर्माण झाला.[१५]

शिवाजी महाराजांच्या राजनीतीचा अभ्यास करताना त्यामध्ये महाराजांच्या ठिकाणी असणारे अनेक गुण आणि प्रशासनिक कुशलता दिसून येते. शिवाजी महाराजांनी राज्यकारभाराच्या आणि प्रशासनाच्या सोयीसाठी अष्टप्रधान मंडळाची स्थापना केली. आठ विभाग आणि प्रत्येक विभागाला स्वतंत्र अधिकारी म्हणजेच मुख्य प्रधान (पेशवा), अमात्य (मुजुमदार), सचिव (सुरनीस), सुमंत (डबीर), सेनापती (सरनोबत), पंडितराव (दानाध्यक्ष), न्यायाधीश, मंत्री (वाकनीस) आणि या सर्व मंत्र्यांना मदत करण्यासाठी नेमलेले दरकदार (अधिकारी) म्हणजे १) दिवाण, २) मुजुमदार हिशोब तपासणीस, ३) फडणीस महसूल हिशोब, ४) सबनीस दप्तरदार, ५) कारखानीस पुरवठाधिकारी, ६) चिटणीस, ७) जामदार-खजिनदार, ८) पोतनीस-नाणेतज्ञ. त्या त्या विभागाने किंवा मंत्र्याने त्याला दिले तेवढेच काम सातत्याने केल्याने तो माणूस त्या कामात निष्णात होतो, अशी महाराजांची धारणा होती.[१६] यासाठी महाराजांनी खजिना (कोषागार), जवाहिरखाना (रत्नशाळा), अंबरखाना (धान्यशाळा), अबदारखाना (पेये), नगारखाना (वाद्य), तालीमखाना (व्यायामशाळा), जामदारखाना (सर्व प्रकारची नाणी), जिरातेखाना (शेती), मुदबकखाना (पाकालय), शरबतखाना (पानक), शिकारखाना (पक्षीशाळा), दारूखाना (स्फोटकशाळा), शहदखाना (आरोग्य), पिलखाना (हत्तीशाळा), फरासखाना (अस्तरणागार), उष्टरखाना (उंटशाळा), तोफखाना (यंत्रशाळा), दप्तरखाना (लेखनशाळा) इ. वेगवेगळे विभाग केले.[१७] तर पोते (खजिना), थट्टी (गोशाळा), शेरी (मनोरंजन, उद्यान), वहिली (रथशाळा वाहनव्यवस्था), कोठी (धान्यागार), सौदागीर (माल), टंकसाल (नाणे छपाई), दरुणी (अंतपूर राणीवसा), बागा (अश्व शाळा), इमारत (बांधकाम, शिल्प), पालखी (शिबिका), छबीना (कायदा आणि सुव्यवस्था) हे बारा महाल स्वतःच्या नियंत्रणात ठेवले.[१८] जावळीच्या चंद्रराव मोऱ्याचा पाडाव, अफजलखानाचा वध, शाहिस्तेखानाची स्वारी, सुरतेची लूट, जयसिंगाची स्वारी व पुरंदरचा तह, आग्रा भेट व सुटका, कोकण विजय, राज्याभिषेक, कर्नाटक मोहीम या महत्त्वपूर्ण घटनांमधून छ. शिवाजी महाराजांच्या राजनीतीचे पैलू ठळकपणे दिसून येतात. गुंड आणि पुंड यांना कठोर शासन करून महाराजांनी बेबंदशाही नष्ट केली आणि लोककल्याणकारी कारभार निर्माण करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. पाटील, देशमुख यांचे महसूल वसूल करण्याचे हक्क जप्त केले व वतनदारांच्या जुलमातून रयतेला सोडवले.[१९] सरंजामशाहीतील दोष महाराजांना माहीत असल्यामुळे सरंजामदार नष्ट करून त्यांना पूर्णपणे कब्जात आणले. आधुनिक राज्याच्या कारभारातील महत्त्वाचे मानले जाणारे सूत्र महाराजांच्या प्रशासनात दिसून येते. बहलोलखानाशी लढताना सेनापती प्रतापराव गुजर ठार झाले. त्यानंतर राज्याचे सेनापतीपद हे त्यांच्या मुलांना न देता हंबीरराव मोहिते या दुसऱ्या सेनानीस दिले गेले, यावरून अधिकारावर घेताना गुणवत्ता व कार्यक्षमता पाहिली जात होती हे लक्षात येते. महाराजांच्या राजनीतीचे आणखी एक महत्त्वाचे सूत्र म्हणजे त्यांनी लष्करी व्यवस्थेप्रमाणेच मुलकी राज्यव्यवस्थेस महत्त्व दिले. त्यामुळेच कर्नाटकातील विस्तीर्ण प्रदेशावर ते आपला अंमल अल्पकाळात निर्माण करू शकले.[२०] कारभारासाठी राज्याची विभागणी हे एक महत्त्वाचे सूत्र शिवाजी महाराजांच्या ठिकाणी दिसून येते. उत्तर कोकणचा प्रदेश व साल्हेरपासून पुण्यापर्यंतचा देशावरचा प्रदेश मोरोपंत पेशव्यांकडे, दक्षिण कोकण व कारवारपर्यंतच्या किनारपट्टीचा प्रदेश अण्णाजी दत्तोंकडे, देशावरचा धारवाड कोपलपर्यंतचा प्रदेश दत्ताजी पंत वाकनीस यांच्याकडे, १६७७ ते ७८ साली कर्नाटकात जिंकलेला प्रदेश जावई हरजी महाडिक यांच्याकडे अशी विभागणी केली. लष्करी आणि मुलकी अशा दोन्ही खात्यातील अधिकाऱ्यांवर महाराजांची करडी नजर होती.[२१] स्वराज्याचे नियम, कानून काटेकोरपणे पाळले जावेत यासाठी महाराज आग्रही होते. तसेच ते कायदे चांगले असावेत यासाठी प्रयत्नशील असायचे. ते स्वतः शिस्त पालन करणारे होते. म्हणूनच स्वराज्य शिस्तप्रिय सैन्य आणि प्रजा शिस्तीची भोक्ती होती. प्रतापगडच्या युद्धप्रसंगी सईबाई मृत्युमुखी पडल्या तरीही महाराज त्यांच्या अंत्यसंस्कारासाठी येऊ शकले नाहीत, की दोन वर्षाच्या संभाजीराजांचे सांत्वनही करण्यासाठी ११ महिने स्वराज्यात राजगडावर आले नाहीत. ही महाराजांची कर्तव्य कठोरता आणि शिस्त होती. 'Mission first we are last' स्वराज्य अगोदर खाजगी, व्यक्तिगत गोष्टी नंतर. 'आधी लगीन कोंढाण्याचे मग रायबाचे' हे शिस्तीचे आणखी एक ज्वलंत उदाहरण. बेकायदा वर्तणूक करायचा प्रयत्न करणाऱ्यांना महाराजांनी बडतर्फी, हात कलम करणे, कडेलोट करणे, डोळे काढणे अशा शिक्षा देऊन शिस्तपालनाचे महत्त्व आणि बेशिस्त पालनाचे परिणाम दाखवून दिले. अगदी औरंगजेब स्वतः सात लाखांची फौज घेऊन स्वराज्यावर चालून आला हे एका बाजूला तर त्याला स्वतःलाच पराभूत होऊन स्वराज्याच्या मातीत मोकळ्या हाताने मरावं लागलं. ते फक्त एकाच गोष्टीमुळे ती गोष्ट म्हणजे स्वराज्याची शिस्तबद्धता.[२२] शिवाजी महाराजांच्या स्वराज्यात आदेश फक्त महाराजांकडूनच दिला जाई. प्रत्येक मंत्र्याला त्याच्या त्याच्या खात्याचा निर्णय घेण्याचा अधिकार होता; परंतु त्याने तो आदेश काढण्यापूर्वी महाराजांची परवानगी घ्यावी आणि मग तो आदेश महाराजांच्या सही-शिक्क्यानिशी पुढे पाठवला जाई. ही आदेशाची एकवाक्यता महाराजांच्या कारभारात होती.[२३] लाल महालावर छापा घालताना महाराजांनी फौजेच्या दोन तुकड्या केल्या होत्या. सगळ्या तुकड्या वेगवेगळ्या मार्गांनी आपल्या ठरलेल्या योजनेप्रमाणे पोहोचल्या आणि छापा यशस्वी झाला. १ लाख २५ हजार फौजेच्या गराड्यात घुसून खानाचा हात छाटून महाराज सिंहगडावर पोहोचले. तसेच कोंढाणा घेतानासुद्धा

६०० मावळ्यांच्या दोन तुकड्या केल्या होत्या. या दोन्ही तुकड्यांनी एकाच दिशेने ठरलेल्या नियोजनानुसार प्रवास केला. त्याचबरोबर 'गनिमी कावा' हे महाराजांचे युद्ध तंत्र म्हणजे चारही बाजूनी फौजा एकाच दिशेने आगेकूच करत ठरलेली योजना अंमलबजावणी करत प्रचंड मोठ्या शत्रूचा मुठभर फौजेच्या मदतीने पराभव करणे. म्हणजेच एकाच दिशेने प्रवास केल्यास लक्ष पूर्णत्वास जाते, हे महाराजांच्या राजनीतीमधील एक वैशिष्ट्य होते.[२४]

महाराजांच्या लोककल्याणकारी कारभाराचे उदाहरण देताना चिपळूण येथील मराठी लष्कराला पाठविलेल्या पत्रात महाराजांनी सैनिकांना बजावलं आहे. ते म्हणतात, "तुमच्या अन्नधान्याची व घोड्याची, घोड्याच्या चाऱ्याची सर्व व्यवस्था सरकारी कारखान्यांकडून केली आहे. तेव्हा आता कारकुनांकडून तुम्ही मनात येईल तसे दाणा, रतीब, गवत मागाल, असेल तोवर धुंदी करून घोडी चाराल आणि मग संपल्यावर मग काही पडत्या पावसात मिळणार नाही. उपास पडतील, घोडी मरावयास लागतील, म्हणजे घोडी तुम्हीच मारली ऐसे होईल आणि मग तुम्ही प्रदेशास त्रास देऊ लागाल. अशा परिस्थितीत कोणी कुणब्याच्या घरून दाणे आणि कोणी भाकर, कोणी गवत, कोणी फाटे, कोणी पाले असे आणाल, असे करू लागलेत म्हणजे जे कुणबी घर करून जीवमात्र घेऊन राहिले आहेत तेही जाऊ लागतील. कित्येक उपाशी मरायला लागतील. म्हणजे त्या कुणब्याला ऐसे होईल की; मोगल मुलकात आले त्याहूनही अधिक तुम्ही. ऐसा तळतळाट होईल. तेव्हा रयतेची व घोड्याची सारी बदनामी तुम्हावरी येईल. तुम्ही राहत्या जागेच्या बाहेर पाय घालण्याची गरज नाही. गवत, फाटा, दाना जे काही पाहिजे ते सरळ बाजारात जाऊन योग्य दराने विकत घ्या. त्यासाठी कोणावरही जुलूम जबरदस्ती करू नका." महाराजांनी १६४५ ते १६८० या ३५ वर्षांच्या त्यांच्या राजकीय कारकीर्दीत प्रचंड लष्कर उभारले आणि एकामागून एक महान विजय कमावले. कृष्णाजी अनंतासारखा तत्कालीन बखरकार त्यांच्या अफजलखानावरील विजयाचे वर्णन करताना म्हणतो, "शिवाजी राजाहि भीमच त्यांनीच अफजल मारिला. हे कर्म मनुष्याचे नव्हे. तो अवतारीच होता तरीही हे कर्म केले."[२५] पुरंदरच्या तहा दरम्यान जयसिंगाच्या बाबतीतील महाराजांचे धोरण म्हणजे त्यांच्या राजनीतीचा आणखी एक विशेष पैलू. जयसिंगाने जर तह केला नाही तर आपण आपल्याकडील सर्व प्रदेश आदिलशहास देऊन त्यास मिळू, अशी धमकी जयसिंगाच्या कानावर जाईल अशी व्यवस्था महाराजांनी केली होती. कर्नाटक मोहिमेतील राजकारणाबाबत रियासतकार सरदेसाई यांचे एक विधान लक्षात घेण्यासारखे आहे. ते म्हणतात, "शिवाजी कपटी, लबाड व अप्रामाणिक होता असा कित्येकांचा आक्षेप आहे. पण कपट शब्दाचा अर्थ मतलबाप्रमाणे बदलत असतो. काहीतरी युक्ती काढून राष्ट्राचे कल्याण साधने हे साधुत्वाचे लक्षण नसेल परंतु राजनीतीत त्यास 'डिप्लोमसी' असे म्हणता येईल. अशा मुत्सद्देगिरीच्या व व्यवहाराच्या जोरावर युरोपीय राष्ट्रे वृद्धी पावली आहेत. तशा व्यावहारिक दृष्टीने शिवाजी लबाड ठरत नाही उलट चतुर ठरतो." आग्र्यास बादशहाची भेट घेण्यातही महाराजांच्या मनात खात्रीने एखादा मुत्सद्देगिरीचा डाव असावा. बादशहाच्या कचाट्यात सापडलेल्या महाराजांनी कैदेतून निसटण्यासाठी अपूर्व योजना आखली आणि आपली सुटका करून घेतली. या घटनेतून महाराजांचे अलौकिक बुद्धीचातुर्य व मुत्सद्देगिरी दिसून येते. महाराष्ट्रात घडून आलेल्या महाराजांच्या राज्याभिषेकास काही महाराष्ट्रीय ब्राह्मण पंडितांनी विरोध केल्याचे दिसून येते. 'या जगात, या कलियुगात आता क्षत्रिय असा कोणी राहिला नाही,' अशी मूर्ख कल्पना काही ब्राह्मण पंडितांनी पसरवली होती. हा केवळ राजकीय प्रश्न नसून सामाजिक महत्त्वाचा प्रश्न आहे हे महाराजांनी जाणले होते. म्हणून त्यांनी विद्वान ब्राह्मण पंडित काशीचे गागाभट्ट यांना पाचारण केले व सर्व शंकांचे निरसन केले व त्यांच्याकडून आपण 'क्षत्रिय' वंशीय असल्याचे घोषित केले. शिवाजी महाराजांनी आपल्या राज्याभिषेकाच्या माध्यमातून जगात क्षत्रिय आहेत, भोसले क्षत्रिय आहेत, हिंदुस्थानात हिंदू राजा सिंहासनावर बसू शकतो व तो स्वतंत्र व सार्वभौम होऊ शकतो या सर्व गोष्टी पटवून दिल्या, ही एक प्रकारची मुत्सद्देगिरी म्हटली पाहिजे.[२६] शिवाजी महाराजांनी 'कसेल त्याची जमीन' हे सूत्र राबवले. शेतकऱ्यांसाठी बाजार व्यवस्था निर्माण केली. मन मानेल तसा महसूल गोळा करण्यावर बंदी घातली. वेळेप्रसंगी शेतकऱ्यांचा शेतसारा माफ केला. महाराजांचा स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोन हा अतिशय सन्मानजनक होता. स्त्रीकडे वेगळ्या नजरेने पाहणाऱ्याला कठोर शिक्षा दिली, याची उदाहरणे म्हणजे सोमाजी गायकवाड नावाच्या सोयऱ्याचे डोळे काढण्याचा आदेश देणे किंवा खंडोजी खोपड्यांबद्दल कान्हेजी जेधेंनी रदबदली केलेली असतानाही हातपाय कलम करणे, गावातील एका गरीब मुलीचा विनयभंग केला म्हणून प्रस्थापित समजल्या जाणाऱ्या रांझ्याच्या पाटलाचेही हात कलम करणे ही शिवाजी महाराजांच्या राजनीतीमधील समता तत्वाची ज्वलंत उदाहरणे होत.[२७]

एकूणच राज्यकारभार करत असताना 'कमीत कमी नुकसान आणि जास्तीत जास्त फायदा' ही छ. शिवाजी महाराजांची राजनीती होती. युरोपियन अभ्यासकांच्या मते, "अतिशय विषम लढायात शिवाजी महाराज विजयी झाले. अशा जगातील सर्वोत्तम चार लढाया म्हणजे अफजलखान, शाहिस्तेखान, सिद्दी जोहर आणि आग्रा येथील औरंगजेबाच्या कैदेतून सुटका. शुभ-अशुभ असा विचार न करता लढाया करून समुद्रात आरमार उभारणारे छत्रपती शिवाजी महाराज म्हणजे भारतीय आरमाराचे जनक व विज्ञानवादी राजा म्हणून ओळखले जातात. एक महान इंजिनिअर व आर्किटेक्चर म्हणून अगदी अल्प

कालखंडात ३६० भव्य असे किल्ले बांधले. तीन प्रकारचे किल्ले त्यामध्ये होते. गड - डोंगरावरील किल्ले, कोट - जमिनीवरील किल्ले आणि जलदुर्ग - समुद्रावरील किल्ले. याशिवाय महाराजांनी दहा ते बारा बंदरे निर्माण केली. यातून महाराजांच्या व्यापार नौका चालायच्या. डच व फ्रेंच यांच्याकडून तोफांचीही खरेदी महाराजांनी केली होती. तर काही शत्रूंवरील विजयामुळे मिळाल्या होत्या. अशा स्वराज्यात जवळपास २०० तोफा लढायांसाठी सज्ज होत्या. अशा कल्याणकारी राजाचा अंत स्वराज्यातील षडयंत्रकारी तत्कालीन ब्राह्मण सहकाऱ्यांच्या कटकारस्थानाने झाला हे सिद्ध झालेले आहे.[२८]

इ. स. १६७३ मध्ये फ्रेंच अबे कॅरे महाराजांबद्दल म्हणतो, "महाराजांची बुद्धिमत्ता एवढ्या श्रेष्ठ प्रतीची आहे की, त्यांच्या बुद्धीला अनाकलनीय असे जगात काहीच नसेल. त्यांची कर्तृत्वशक्ती तर त्यांच्या बुद्धिमत्तेपेक्षाही वरचढ आहे. ते अतुलनीय पराक्रमी योध्ये आहेत. थोर मुत्सद्दी आहेत. स्वराज्य संस्थापनेसाठी त्यांचा जन्म असल्यामुळे सेनापतीच्या अंगी कोणते गुण असावे लागतात, सैनिकाच्या ठिकाणी कोणते गुण असावे लागतात याचा त्यांनी बारकाईने विचार केलेला आहे. गडाच्या तटबंदीचा अभ्यास त्यांनी केला आहे. भूगोलाचा त्यांचा विशेष व्यासंग आहे. देशातील केवळ लहान मोठी शहरेच त्यांना माहित आहेत असे नव्हे, तर प्रत्येक जागा न् जागा झुडूप न् झुडूप त्यांना ठाऊक आहे. अशा सर्व मुलखाचे त्यांनी नकाशे तयार केलेले आहेत. त्यांच्या चपळतेचा वा दक्षतेचा शत्रूला ठाव लागणे कठीण असते. संपूर्ण देशातील प्रत्येक राजाच्या दरबारात महाराजांचे गुप्तहेर आहेत. आपल्या देशाला वैभवाच्या मार्गावर आणून सोडण्यासाठीच महाराजांचा अवतार आहे."

कॉस्म द गार्द या पोर्तुगीज लेखकाने महाराजांचे केलेले वर्णन, इ. स. १६९५ साली तो लिहितो, "With a clear and fair face nature had given him the greatest perfections specially the dark big eyes were so lively that they seemed to dart rays to fire. To these was added a quick, clear and acute intelligence."[२९]

शिवाजी महाराजांच्या संदर्भात कवी भूषण म्हणतो,

भूषण असाम रूम बलख बुखारे जे है
चीन सिलहठ तरी जलधि जहाज पै
सब उमरावनकी हट कुरताई देखो, कहैं नवरंगजेब साहिसिरताज पै |
भीख मांगी खै हैं बिन मनसब रहैं पै न जैहैं हजरत महाबली सिवराज पै |

(मोगली सरदार बादशहाला म्हणाले की, "म्हणाल तर आसाम सयामच काय, पण हिंदुस्तान बाहेर असलेले रूम, बलख, बुखारापावेतो जाऊ, जहाजात बसून समुद्र उल्लंघन करून चीन, सिल्हटसारख्या देशांमध्ये जाऊन भीक मागून खाऊ, मनसबीशिवाय राहू, पण त्या महाप्रतापी शिवराजावर मात्र चाल करून जायला सांगू नका.")[३०]

**छत्रपती शिवाजी महाराजांच्या राजनीतीचे महत्त्वपूर्ण पैलू**

१. कामाची विभागणी
२. अधिकार आणि जबाबदारी यामधील समतोल
३. शिस्त
४. आदेशामधील एकवाक्यता
५. आधी स्वराज्य मग वैयक्तिक हित
६. सहकाऱ्यांना कामाचा योग्य मोबदला
७. काही अधिकारांचे केंद्रीकरण
८. माणसांची योग्य पारख
९. समतेचे तत्व
१०. द्रष्टेपणा
११. संघ भावनेची जोपासना

**संदर्भ सूची**

१) प्रा. डॉ. जयसिंगराव भाऊसाहेब पवार, 'शिवाजी व शिवकाल', फडके प्रकाशन, कोल्हापूर, सहावी आवृत्ती १९९५, पृष्ठ क्र.१,२

२) खेडेकर पुरुषोत्तम, 'शिवचरित्र', जिजाई प्रकाशन, पुणे ३०, सुधारित आवृत्ती, १ सप्टेंबर २०१६, पृष्ठ क्र. १५२

३) संपादक, जोशी, तर्क. श्री. लक्ष्मणशास्त्री, 'मराठी विश्वकोश, खंड १२', महाराष्ट्र राज्य विश्वकोश निर्मिती मंडळ, प्रथमावृत्ती १९८५, पृष्ठ क्र. ७८०

४) संपादक, कि. का. चौधरी, 'कोल्हापूर जिल्हा' महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर, महाराष्ट्र शासन मुंबई, सुधारित आवृत्ती १९८९, पृष्ठ क्र. ४७

५) इतिहास पाठ्यपुस्तक अभ्यासक्रम, वर्ग सातवा, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ, पुणे ३०, प्रथम आवृत्ती २०१७, पृष्ठ क्र. १९

६) प्रा. डॉ. जयसिंगराव भाऊसाहेब पवार, 'शिवाजी व शिवकाल', फडके प्रकाशन, कोल्हापूर, सहावी आवृत्ती १९९५, पृष्ठ क्र. ४०

७) खेडेकर पुरुषोत्तम, 'शिवचरित्र', जिजाई प्रकाशन, पुणे ३०, सुधारित आवृत्ती, १ सप्टेंबर २०१६, पृष्ठ क्र. ७०

८) संपादक प्रा. डॉ. कपिल राजहंस, 'सर्वव्यापी शिवराय', निर्मिती प्रकाशन, श्रावस्ती प्रकाशन, प्रथम आवृत्ती २०२२, पृष्ठ क्र. ६२५

९) प्र. न. देशपांडे, 'छत्रपती शिवाजी महाराज', महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई, द्वितीय आवृत्ती २००७, पृष्ठ क्र. १७

१०) कित्ता, पृष्ठ क्र. १८

११) कित्ता, पृष्ठ क्र. १९

१२) प्रा. डॉ. जयसिंगराव भाऊसाहेब पवार, 'शिवाजी व शिवकाल', फडके प्रकाशन, कोल्हापूर, सहावी आवृत्ती १९९५, पृष्ठ क्र. ४६

१३) कित्ता, पृष्ठ क्र. ५३

१४) खेडेकर पुरुषोत्तम, 'शिवचरित्र', जिजाई प्रकाशन, पुणे ३०, सुधारित आवृत्ती, १ सप्टेंबर २०१६, पृष्ठ क्र. ७३

१५) कित्ता, पृष्ठ क्र. ९५

१६) प्रा. नामदेवराव जाधव, 'शिवाजी द मॅनेजमेंट गुरू', राजमाता प्रकाशन, प्रथमावृत्ती २०११, पृष्ठ क्र. ३०,

१७) कित्ता, पृष्ठ क्र. ३१,

१८) कित्ता, पृष्ठ क्र. ३२

१९) प्रा. डॉ. जयसिंगराव भाऊसाहेब पवार, 'शिवाजी व शिवकाल', फडके प्रकाशन, कोल्हापूर, सहावी आवृत्ती १९९५, पृष्ठ क्र. १९६

२०) कित्ता, पृष्ठ क्र. १९७

२१) कित्ता, पृष्ठ क्र. १९९

२२) प्रा. नामदेवराव जाधव, 'शिवाजी द मॅनेजमेंट गुरू', राजमाता प्रकाशन, प्रथमावृत्ती २०११, पृष्ठ क्र. ३५

२३) कित्ता पृष्ठ क्र. ३९

२४) कित्ता पृष्ठ क्र. ४१

२५) प्रा. डॉ. जयसिंगराव भाऊसाहेब पवार, 'शिवाजी व शिवकाल', फडके प्रकाशन, कोल्हापूर, सहावी आवृत्ती १९९५, पृष्ठ क्र. २०१

२६) कित्ता, पृष्ठ क्र. २०९

२७) इतिहास पाठ्यपुस्तक, वर्ग सातवा, पृष्ठ क्र. २९

२८) खेडेकर पुरुषोत्तम, 'शिवचरित्र', जिजाई प्रकाशन, पुणे ३०, सुधारित आवृत्ती, १ सप्टेंबर २०१६, पृष्ठ क्र. १८९

२९) प्रा. नामदेवराव जाधव, 'शिवाजी द मॅनेजमेंट गुरू', राजमाता प्रकाशन, प्रथमावृत्ती २०११, पृष्ठ क्र. १०९, ११०

३०) कित्ता, पृष्ठ क्र. १०७